महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा

उपजिल्हा रुग्णालय सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग.

| | | |
|---|---|---|
| वैयक्तीक दूरध्वनी क्र. –<br>कार्यालय दूरध्वनी क्र. –<br>कर्यालय फॅक्स क्र.– | 02363 275035<br>02363 275035 | खासकील वाडा, मोतीतलावा जवळ सावंतवाडी.<br>ई–मेल –ms_sdhsawantwadi@yahoo.co.in |
| आरोग्य सेवा | पत्र क्रं.उजिरुसा/निविदा/प्लास्टीक कॅन व पुठ्ठा निर्लेखन/ 690 /२६<br>दिनांक :- / /२०२६ | |


## निरुपयोगी साहित्य लिलाव सुचना पत्र

**उपजिल्हा रुग्णालय सावंतवाडी येथील विनावापर प्लास्टीक कॅन, पुठ्ठा निर्लेखनाकरीता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात दरपत्रके मागविणेत येत आहेत.**

अटी व शर्ती -

१) दरपत्रक सादर करताना दरपत्रकावर संबधित पुरवठादार संस्थेच्या लेटरहेटवर सादर करण्यात यावे.

२) दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकारण्याचा, बदल करण्याचा अथवा संख्यात्मक बदल करण्याचा अधिकार वैद्यकिय अधिक्षक उपजिल्हा रुग्णालय सावंतवाडी यांनी राखुन ठेवला आहे. दरपत्रकात नमुद केलेले दर हे उपलब्ध बाजार भावापेक्षा जास्त नसावे.

३) दरपत्रकामध्ये खाडाखोडे केल्याचे आढळल्यास दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.

४) विहीत मुदतीत सादर न केलेले दरपत्रक स्विकारण्यांत येणार नाही.

५) दरपत्रक सादर करताना दरपत्रकावर स्थानिक बाजारातील मान्यता प्राप्त संस्थाचाच विचार करण्यात येईल.

६) दरपत्रक सादर करताना दरपत्रकावर सबंधित पुरवठादार संस्थेच्या लेटरहेडवर SGST/CGST/VAT/CST क्रमांक असणे आवश्यक आहे.

७) इच्छुक पुरवठाधारकांनी बाबनिहाय **दरपत्रके मोहोरबंद लिफाफयात** सादर करावीत. त्यावर सदर जाहीर **नोटीस जावक क्रमांक व दिनांक व "प्लास्टिक कॅन, पुठ्ठा खरेदीकरीता दरपत्रक"** असे नमुद असावे. . **सदर सर्व करासह समावेशक दर पत्रके दि. १८.०२.२०२६ रोजी दुपारी ०४.००वाजेपर्यंत** (व्यक्तीशः अथवा पोस्टाने) स्वीकारण्यात येतील. **दि. १८.०२.२०२६ रोजी सायंकाळी** ०५.०० वाजता दरपत्रके उघडण्यात येतील.

८) मंजुरी आदेश प्राप्त होताच ३ दिवसांच्या आत शासकीय पावती करुन साहित्य ताब्यात घेणेचे आहे. सदर विक्रीसाहीत्य मुदतीत न नेल्यास या कार्यालयाची जबाबदारी राहणार नाही. सदर विि

९) दरपत्रके सादर करणेपुर्वी निर्लेखित करावयाच्या वस्तुंची पाहणी दि. १३.०२.२०२६ ते १८.०२.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत रुग्णालयीन सुरक्षारक्षक यांचेसोबत करता येईल.

१०) दरपत्रक सादर करताना मक्तेदारांनी आपल्या दुकान/संस्था नोंदणी दाखला ( उदा. नगरपरिषद/ग्रामपंचायत नोंदणी अथवा जीएसटी नोंदणी दाखला) तसेच नोंदणी पत्रकावर नमुद मालकाचा पॅन कार्ड अथवा संस्थेच्या पॅन कार्ड ची झेरॉक्स जोडणे आवश्यक आहे.

११) पोस्टाने पाठविलेले दरपत्रक उशीराने प्राप्त झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच मुदतीत प्राप्त न होणारी एक अगर सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखुन ठेवला आहे.

Medical Superintendent, Cl.1
Sub-District Hospital, Sawantwadi

(लेटरहेडवर देणेचे दरपत्रक नमुना)

प्रति,
मा.वैदयकिय अधिक्षक,
उपजिल्हा रुग्णालय, सावंतवाडी.

विषय – प्लास्टिक कॅन, पुठ्ठे खरेदी साठी दरपत्रक सादर करणे बाबत....
संदर्भ – सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांचे संकेत स्थळावर प्रसिध्द केलेली दरपत्रक सूचना पत्र क्र. उजिरुसा/भांडार प्लास्टिक कॅन पुठठा निर्लेखन/ /२०२६ दिनांक :-१२/०२/२०२६

महोदय,

संदर्भिय विषयानुसार मी/आम्ही खालील काम करणेसाठी वाजवी दर देत आहोत.

| Sr. No. | Particulars | दर (सर्व करांसहीत) |
|---|---|---|
| १ | प्लस्टिक कॅन (प्रतिकीलो दर) | |
| २ | पुठ्ठा (प्रतिकिला दर) | |

सर्व कागदपत्राचे झेरॉक्स प्रतीवर स्वतः सही करुन साक्षांकित करावेत.

सोबत – १) पॅन कार्ड झेरॉक्स
२) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र
३) नोंदणी प्रमाणपत्र
४) बँक खाते कॅन्सल चेक
५)
६)

आपला/आपली विश्वासू,

सील/शिक्का

# बंधपत्र

मी / आम्ही गांभीर्यपूर्वक नमूद करीतो की मी/आम्ही वर नमूद केलेल्या साहित्य पूरवठा कामाच्या सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून या निविदेसाठी माझे/आमचे दर निविदे सोबत असलेल्या प्रपत्र अ मध्ये नमूद करीत आहे/आहोत.

जर माझी/आमचे दरपत्रक स्वीकृत करणेत आली तर निविदेमधील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास मी/ आम्ही बांधिल राहू. या अटी व शर्तीचा भंग मी/ आम्ही केल्यास या दरपत्रकातील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशीला नुसार मी/आम्ही केल्यास या दरपत्रकातील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशीलानुसार मी/आम्ही दंडनीय कार्यवाहीस पात्र राहू.

मी/आम्ही दरपत्रकात दिलेल्या साहित्य पूरवठा प्रपत्र मधील तपशीलानुसार अट क्र. १ ते १३ करीता बांधिल राहू.

वरील सर्व अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत.

स्थळः

दिनांकः

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

नावः

पत्ताः

# स्वघोषणापत्र

१) मी/आम्ही असे जाहिर करतो कि, या दरपत्रकामध्ये किमान मूल्यापेक्षा अधिक दर नमूद केलेले नाहीत अथवा बाजारभावापेक्षा अधिक दर नमुद केलेले नाहीत. या दरपत्रकात नमुद करणेत आलेली उत्पादक कंपनी किंवा माझा व्यवसाय काळयायादीतील नाही. मी किंवा माझे व्यवसायातील नोकरवर्ग यांचा जिल्हा शल्य चिकित्सक, सिंधुदुर्ग किंवा त्यांचे अधिपत्याखालील संस्था यामध्ये कोणतेही नाते वा हितसंबंध नाहीत. माझे व्यवसायाला काळया यादीमध्ये टाकलेले नाही अथवा तसे संबंधित विभागाकडुन प्रस्तावित केलेले नाही.

२) मी/आम्ही असे जाहिर करतो कि, माझे/आमचे व्यवसायाचे जीएसटी -वस्तु व सेवा कर याची नोंदणी झालेली असून वार्षिक आर्थिक उलाढाल रु. २०.०० लक्ष पेक्षा अधिक असलेने जीएसटी - वस्तु व सेवा कर परतावा नियमित भरणेत येतो.

३) मी/आम्ही असे जाहिर करतो कि, माझे/आमचे व्यवसायाचे वार्षिक आर्थिक उलाढाल रु. २०.०० लक्ष पेक्षा कमी असलेने जीएसटी- वस्तु व सेवा कर या बाबतची नोंदणी केलेली नाही.

(२) व (३) पैकी जे आवश्यक आहे हे ठेवून इतर खोडावे.

स्थळ -

दिनांक -

नाव, सही व रबरी शिक्का